# ठाणे महानगरपालिका, ठाणे

## समाज विकास विभाग

### ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांग व्यक्तींकरीता विविध कल्याणकारी योजनांबाबत

## जाहिर सुचना

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांग व्यक्ती कल्याणकारी योजने अंतर्गत -सन २०१९-२० या आर्थिक वर्षामध्ये विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत असून ठाणे महानगरपालिका हद्दीत रहिवाशी असणाऱ्या दिव्यांग व्यक्तींना सदर योजनेचा लाभ घेण्याकरीता **योजना क्रमांक १ ते १५, २६ व २९ या योजनांचे अर्ज** दि.२८/०८/२०१९ ते दि.२६/०९/२०१९ पर्यंत ठाणे महानगरपालिकेच्या सर्व प्रभाग समिती कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. परिपूर्ण भरलेले अर्ज दि. २८/०८/२०१९ ते दि.२७/०९/२०१९ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यत अर्ज प्रभाग समिती कार्यालयात स्विकारण्यात येतील. **योजना क्र. ३ दिव्यांग व्यक्ती/विद्यार्थी खेळाडूकरिता शिष्यवृत्ती / अर्थसहाय्य देणे. (जिल्हास्तर ), योजना क्र.४ दिव्यांग व्यक्ती/विद्यार्थी खेळाडूकरिता शिष्यवृत्ती / अर्थसहाय्य देणे. (राज्यस्तर/राष्ट्रीयस्तर/आतंरराष्ट्रीय स्तर), योजना क्र. १० दिव्यांग व्यक्तींना वैद्यकीय खर्चाकरिता अर्थसहाय्य देणे. योजना क्र. १४ दिव्यांग व्यक्तीच्या लग्नासाठी अर्थसहाय्य देणे** या योजनांकरिता मुदत दि. २९ फेब्रुवारी २०२० रोजीपर्यत राहील व परिपुर्ण भरलेले अर्ज दि.०१/०३/२०२० रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अर्ज प्रभाग समिती कार्यालयात स्विकारण्यात येतील. एका लाभार्थ्यास एकाच योजनेचा लाभ घेता येईल.

**समाज विकास विभागाकडून दिव्यांग व्यक्तींसाठी पुढील कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत.**

| अ.क्र | योजना क्र. | योजनेचे नाव |
|---|---|---|
| १ | १ | दिव्यांग विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणाकरिता शिष्यवृत्ती/ अर्थसहाय्य देणे. |
| २ | २ | दिव्यांग विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाकरिता शिष्यवृत्ती / अर्थसहाय्य देणे. |
| ३ | ३ | दिव्यांग व्यक्ती/विद्यार्थी खेळाडूकरिता शिष्यवृत्ती / अर्थसहाय्य देणे. (जिल्हास्तर ) |
| ४ | ४ | दिव्यांग व्यक्ती/विद्यार्थी खेळाडूकरिता शिष्यवृत्ती / अर्थसहाय्य देणे. (राज्यस्तर/राष्ट्रीयस्तर/आतंरराष्ट्रीय स्तर ) |
| ५ | ५ | उत्पन्नाच्या अटीवर घरकुलामध्ये दुरुस्ती/सुधारणा करण्यासाठी अर्थ सहाय्य देणे. |
| ६ | ६ | दिव्यांग व्यक्तीना उदरनिर्वाह करण्याकरिता निधी थेट लाभार्थ्याच्या बँक खात्यात(NEFT /RTGS /ECS) द्वारे अदा करणे. |
| ७ | ७ | दिव्यांग व्यक्तींना व्यवसाय करण्याकरिता निधी थेट लाभार्थ्याच्या बँक खात्यात खात्यात (NEFT /RTGS /ECS) जमा करणे. |
| ८ | ८ | दिव्यांग व्यक्तींना साहित्य खरेदी करण्याकरिता निधी थेट लाभार्थ्याच्या बँक खात्यात खात्यात (NEFT /RTGS /ECS) जमा करणे. |
| ९ | ९ | कर्णबधीर मुले (शस्त्रक्रिया झालेली) यांचे वैद्यकीय खर्चासाठी अर्थ सहाय्य देणे. |
| १० | १० | दिव्यांग व्यक्तींना वैद्यकीय खर्चाकरिता निधी उपलब्ध करुन देणे. |
| ११ | ११ | दिव्यांग व्यक्तीच्या बचत गटांना अर्थ सहाय्य देणे. |
| १२ | १२ | ६० वर्षावरील दिव्यांगाना उदरनिर्वाहासाठी अर्थसहाय्य देणे. |
| १३ | १३ | दिव्यांग बेरोजगारांना भत्ता / अर्थसहाय्य देणे. |
| १४ | १४ | दिव्यांग व्यक्तीच्या लग्नासाठी अर्थ सहाय्य करणे. |
| १५ | १५ | कुष्ठ रुग्णांना उदरनिर्वाहासाठी अनुदान देणे . |
| १६ | २६ | दिव्यांगासाठी सेन्सर स्टिक, डिजिटल श्रवणयंत्र यासारखे अत्याधुनिक साहित्य पुरविणे/अर्थसहाय्य देणे. |
| १७ | २९ | दिव्यांग व्यक्तीना स्कूटर विथ अडप्शनसाठी अर्थसहाय्य देण. |

**टिप :-** ठाणे महानगरपालिकेच्या सर्व प्रभाग समिती कार्यालयात दिव्यांग व्यक्ती कल्याणकारी योजनेचे वरील कालावधीमध्ये अर्ज उपलब्ध असून सदरचे अर्ज पुर्ण विहित कालावधीत भरुन संबंधित प्रभाग समिती कार्यालयात स्विकारण्यात येतील. विविध योजनांचे छापील अर्जावर अनुक्रमांक देण्यात आले असल्याने सदर अर्जाचाच स्विकार केला जाईल. झेरॉक्स अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**मा.आयुक्त सो यांच्या मान्यतेने.**

(वर्षा दिक्षीत)
उपआयुक्त
समाज विकास विभाग,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.